जनसंपर्क कक्ष
24 JUN 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पालकांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य द्यावे


## शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांच्या क्षमता व कल विचारात घेऊन, पालकांनी त्यांच्या आवडीनुसार विषयाची निवड केली पाहिजे. सध्या बऱ्याच शिक्षण संस्था जाहिरातबाजी करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे महाविद्यालयातील प्राथमिक सोयी–सुविधा व सुसज्ज प्रयोगशाळा, वाचनालय, संबंधित महाविद्यालयातील शिक्षण पद्धतीची चौकशी करूनच शिक्षण संस्थेची निवड करावी. कारण कंपनीला कौशल्य विकसित मनुष्यबळाची गरज असते, असे मत शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स आणि इंडिया कोल्हापूर लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१८' या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स आणि इंडिया कोल्हापूर लोकल सेंटरचे डॉ. पी. व्ही. कडोले होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. जयदिप बागी.

डॉ. बागी म्हणाले, पालकांनी आपल्या पाल्यावर आपले विचार न लादता त्यांना आपल्या आवडीचे क्षेत्र निवडण्यासाठी स्वातंत्र्य द्यावे. कारण विद्यार्थ्यांच्या आवडीचा विषय असेल तर ते त्यामध्ये चांगले करिअर करू शकतात.

तसेच प्रवेश अर्ज भरताना सर्व पर्याय काळजीपूर्वक भरून, शिक्षण संस्थेचा योग्य पसंतीक्रम देण्याची गरज आहे, असा उपस्थितांना सल्ला दिला. तसेच शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात असलेल्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हील इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी आदी विषयांची माहिती दिली. डॉ. पी. ए. प्रभू यांनी अभियांत्रिकी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच बारावी विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखा व त्यातील संधी तसेच केंद्रीय प्रवेश प्रक्रिया या विषयावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

डॉ. प्रवीण उके म्हणाले, भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे कृषी अभियांत्रिकीच्या माध्यमातून देशाच्या विकासाला चालना देता येते. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी कृषी पदवीसाठी प्रवेश घेतला पाहिजे. या प्रवेश प्रक्रियेबद्दल माहिती दिली.

यावेळी डॉ. ए. के. साहू, डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. आर. जे. देशमुख, डॉ. एस. बी. चव्हाण, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. महेश साळुंखे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी मोठी गर्दी केली होती.

4 JUN 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**जयदीप बागी : अभियांत्रिकी अभ्यासक्रम, केंद्रीय प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन**

# पाल्याची आवड ओळखून प्रवेश निश्चित करा

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** पालकांनी आपल्या पाल्याची आवड व त्याची पात्रता ओळखून त्याचा प्रवेश निश्चित करावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी रविवारी येथे केले.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर केंद्र आणि विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आयोजित मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. केशवराव भोसले नाट्यगृहातील या शिबिरात बारावी उत्तीर्ण विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना ‘अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (कॅप २०१८)’ या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी दि. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर केंद्राचे अध्यक्ष डॉ. पी. व्ही. कडोले होते.

डॉ. बागी म्हणाले, अभियांत्रिकीमधील कोणत्या शाखेस प्रवेश घ्यायचा हा विद्यार्थी आणि पालकांसमोर गंभीर विषय असतो. त्यातून त्यांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. याबाबत त्यांनी गोंधळून जावू नये. पालकांनी आपल्या पाल्यावर आपले विचार लादू नयेत. पाल्याला त्याच्या आवडीचे क्षेत्र निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे.

या कार्यक्रमात दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे सदस्य प्रा. प्रवीण उके यांनी कृषी अभियांत्रिकीची माहिती दिली. त्यातील उच्चशिक्षण, रोजगाराच्या संधींची माहिती दिली. प्रा. एस. बी. अकिवाटे यांनी टेक्सटाईल अभियांत्रिकीमधील पाच अभ्यासक्रमांची माहिती दिली. तंत्रज्ञान अधिविभागातील प्रा. पी. ए. प्रभू यांनी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन प्रवेश नोंदणी, पर्यायी अर्ज कसा भरावा, राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्तीची माहिती दिली.

यावेळी दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर केंद्राचे मानद सचिव मनोज चव्हाण, सदस्य खतकर, संजय खोत, विष्णू सानप, डॉ. ए. के. साहू, ए. बी. कोळेकर, आर. जे. देशमुख, एस. बी. चव्हाण, पी. डी. पाटील, महेश साळुंखे, आदी उपस्थित होते.



### पर्याय काळजीपूर्वक भरावेत

प्रवेश अर्जातील सर्व पर्याय काळजीपूर्वक भरावेत. शिक्षण संस्थेचा योग्य पसंतीक्रम देणे महत्त्वाचे आहे. शिक्षणपद्धती, सुविधांची माहिती घेऊन शिक्षण संस्थेची निवड करावी, असे डॉ. बागी यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विविध शाखा, अभ्यासक्रमांची माहिती दिली.

24 JUN 2018
जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशासाठी सकारात्मकता ठेवा : डॉ. बागी

## अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी विषयावर मार्गदर्शन शिबिर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अभियांत्रिकीमधील कोणत्याही शाखेची पदवी मिळविल्यावर नोकरी मिळेलच असे नाही; पण आवडीच्या क्षेत्रात सकारात्मकता ठेवून झोकून देऊन काम केल्यास यशाबरोबरच सर्व गोष्टी सहज मिळतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले.

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, कोल्हापूर स्थानिक केंद्र व शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया-२०१८' याविषयावरील मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. डॉ. बागी म्हणाले, १०, १२ वी नंतर शिक्षण घेताना आंतरविद्या शाखीय दृष्टिकोनाबरोबर पायाभूत कौशल्ये आत्मसात करणे महत्त्वाचे आहे.




**कोल्हापूर : अभियांत्रिकी प्रवेश मार्गदर्शन शिबिर उद्‌घाटन प्रसंगी डॉ. जयदीप बागी, डॉ. पी. व्ही. कडोले, प्रा. प्रवीण उके आदी. (छाया : तय्यब अल्ली)**

डॉ. डी. वाय. पाटील अ‍ॅग्रीकल्चरल कॉलेज, तळसंदेचे प्रा. प्रवीण उके यांनी कृषी अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी विषयावर मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्रात करिअर केल्यास शंभर टक्के रोजगार मिळतो. 'डीकेटीई' इचलकरंजीचे समन्वयक प्रा. एस. बी. अकिवाटे यांनी टेक्स्टाईल अभियांत्रिकी कोर्सेसबाबत, पी. ए. प्रभू यांनी अभियांत्रिकी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन केले. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे अध्यक्ष डॉ. पी. व्ही. कडोले, मानद सचिव मनोज चव्हाण, प्रा. अजय देशपांडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 JUN 2018
सकाळ

# आवड लक्षात घेऊन अभियांत्रिकी शाखा निवडावी : डॉ. बागी

## द इन्स्टिट्यूट इंजिनिअर्सतर्फे कार्यशाळा



कोल्हापूर ता. ३ : अभियांत्रिकी शाखेअंतर्गत अनेक अभ्यास शाखा आहेत, मात्र विद्यार्थ्यांनी आपली आवड, क्षमता, संधी या गोष्टी पाहून विद्या शाखेची निवड करावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले. रविवारी केशवराव भोसले नाट्यगृहात अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी व केंद्रीय प्रवेश परीक्षा, या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) यांच्यातर्फे या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

प्रा.बी.आकीवाटे यांनी कृषी तंत्रज्ञानातील संधी सांगितल्या. प्रा. प्रभू यांनी केंद्रीय प्रवेश परीक्षेची माहिती सांगितली. यामध्ये फॉर्म कसा भरायचा, ऑनलाईन नोंदणी कशी करायची याबद्दल मार्गदर्शन केले.

या वेळी द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) चे अध्यक्ष डॉ पी. व्ही. कडोले, संजय खोत, विष्णू सानप यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

### संधी सांगितल्या समजावून

**डॉ. बागी म्हणाले, ''बारावीनंतर अभियांत्रिकी शाखेच्या नेमक्या कोणत्या विद्याशाखेत प्रवेश घ्यायचा हा प्रश्न पालकांना आणि विद्यार्थ्यांना पडतो. या वेळी आपली आवड, क्षमता, संधी यांचा विचार करून मगच विद्याशाखेची निवड करावी. त्यामुळे अध्ययायन करणे सोपे होईल. केमिकल टेक्नॉलजी, इलेक्ट्रॉनिक्स, टेलिकम्युनिकेशन, अशा विविध विद्याशाखांमधील करिअरच्या संधी समजावून सांगितल्या.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 JUN 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे ९१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. ३० दिवसांतच निकाल जाहीर करण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

परीक्षा विभागाला परीक्षेनंतर ४५ दिवसांत निकाल जाहीर करणे आवश्यक असते. ज्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा होऊन ३० दिवस झाले, त्यांचे निकाल जाहीर केले आहेत. या आठवड्यात निकाल जाहीर केले आहेत. उर्वरित अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यासाठी विभागातील मनुष्यबळ जोमाने कार्यरत आहे. मेमध्ये झालेल्या परीक्षांचे निकाल ४५ दिवसांपूर्वीच जाहीर होतील, असेही सांगितले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2018
पुढारी

# मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

**कोल्हापूर ( प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ -निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी वाचन व लेखन प्राथमिक प्रगत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ५ जून ते ५ जुलै या कालावधीत दररोज सायंकाळी ५ ते ७ यावेळेत विद्यापीठ हायस्कूल, अंबाबाई मंदिरजवळ हा वर्ग होणार आहे. जन्म-मृत्यूच्या नोंदी, मालमत्तेचे उतारे, पोटखत उतारे, जातीचे दाखले, कब्जे, गहानपत्रक, कडई पत्रक, आकारबंदी जमिनपत्रक, इनामपत्रे, सनदपत्रे, फेरीस्त, कैफीयतनामा अशी लाखो कागदपत्रे मोडीतच आहेत. याचे वाचन करून इतिहास संशोधनात मौलिक भर घालून राष्ट्राची संपत्ती असणाऱ्या इतिहासाचे जतन-संवर्धन-संरक्षणासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी लोकांनी मोडी प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्याचे आवाहन संयोजक उदयसिंह राजेयादव व वसंत सिंघण यांनी पत्रकाद्वारे केले आहे.